# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधीक्षक कार्यालय नागपूर

दिनांक १८/०५/२०२१ (मंगळवार)

## बनावट वाहन चालविण्याचा परवाना (लायसन्स) तयार करणाऱ्यास स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांनी केले गजाआड

पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत मौदा टाऊन येथे एक इसम बनावट वाहन चालविण्याचा परवाना अवघ्या १५ मिनिटात तयार करुन देतो अश्या माहितीवरुन दिनांक १७/०५/२०२१ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण येथील पोलीस निरीक्षक अनिल जिट्टावार यांनी त्यांचे अधिनस्थ पथकाला सदरच्या माहितीची शहानिशा करुन कारवाईचे आदेश दिल्याने व संबंधीत बाब मोटार परिवहन विभाग यांचेशी संबंधीत असल्याने संयुक्तीकरित्या मौदा येथील नवाब फोटो स्टुडीयो येथे कारवाई केली असता, **नवाब जमीर बेग वय ५० वर्ष, रा. ओमसाई नगर, मौदा** यांचे नावे असलेले नवाब फोटो स्टुडीयो येथून वेग वेगळया नावाचे बनावट वाहन चालविण्याचे परवाने मिळुन आले, त्याबाबत त्याचेकडे कोणतेही समाधानकारक उत्तर नसल्याने त्याच्या ताब्यातुन सदर बनावट परवाने तयार करण्याचे साहीत्य **एकुण किंमती ६५,०४०/— चा** माल जप्त करून पोलीस स्टेशन मौदा येथे भादविचे कलम ४६५,४६८,४७१,४७२ अन्वये गुन्हा नोंद करुन पुढील तपास पोलीस स्टेशन मौदा करित आहे.

**सदर इसम गावातील लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेवून त्यांचे आधारकार्ड व फोटो घेवून रुपये ४,०००/— ते ५,०००/— मध्ये आरोपी नवाब जमीर बेग वय ५० वर्ष, रा. ओमसाई नगर, मौदा हे त्याचे फोटो स्टुडीयो मध्ये १५ मिनिटीच्या अवधीत बनावट वाहन चालविण्याचा परवाना तयार करुन देतो. यावरुन सदर आरोपी इसमाने यापुर्वी ज्यांना असे परवाने तयार करुन दिले आहे. अश्यानी पोलीस स्टेशन मौदा येथे त्वरीत संपर्क साधाण्याचे आव्हान नागरीकांना करण्यात येते.**

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा अनिल जिट्टावर यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेतील पोउपनि नरेन्द्र गौरखेडे, सचिन मत्ते, सफौ लक्ष्मीप्रसाद दुबे, पोहवा विनोद काळे, नापोशि शैलेश यादव, सत्यशिल काठोरे, अरविंद भगत, पोशि प्रणय बनाफर व चासफौ साहेबराब बहाळे व श्री अमित दिलीप कराड, सहायक मोटार वाहन निरीक्षक प्रादेशिक परीवहन कार्यालय नागपुर ग्रामीण यांचे पथकाने केली.

## —: चोरी (कोळसा ) :—

पो.स्टे. कन्हान :— अंतर्गत १२ किमी अंतरावरील घाटरोहना शिवार कन्हान येथ दिनांक १७/०५/२०२१ रोजी उप विभागीय पोलीस अधिकारी कन्हान कार्यालयातील पथक हे रात्रगस्त करित असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, घाट रोहना येथे टक क्र एम पी ०९ एच एच ६५२१ मध्ये गोडेगाव खदान येथील चोरीचा कोळसा भरून घेउन जात आहे मिळालेल्या माहीतीवरून सदर पथक घटना स्थळी गेले असता पोलीसाची गाडीला पाहुन तेथील कोळसा भरणारे मजुर पळुन गेले ट्रक चालक मुकंश कुमार छित्तरमल मेवाळा वय ४२ रा आलाउमरोट त.साजापर जि मध्यप्रदेश यास पथकानी विचारपुस केली असता त्यांने उमेश मारोतीराव पानतावने वय ४८ रा कांद्री कन्हान याचे सागण्यावरून कोळसा घाट रोहना येथुन भरले असून त्यांनी कोळसा वाहतुकीचे कोणतीही **बिल्टी व गेट पास उपलब्ध करु दिली नसल्याने कोळसा हा चोरीचा आहे असे समजल्यावरून २० टन कोळसा प्रत्योकि टन ५,००० रू प्रमाणे कि.** १,००,००० रू व **ट्रक क्र. एम पी ०९ एच एच ६५२१ किमती अदाजे ८,००,००० रू असा एकुण ९,००,००० चा मुद्येमाल** व आरोपी ताब्यात घेण्यात आले.

सदर प्रकरणी फिर्यादी पीसी विक्की उमेश कोथरे पोस्टे खापरखेडा सध्या नेमनुक एस डी पी ओ कार्यालय कन्हान चे लेखी रिपोर्ट वरुन त आरोपी १) मुकंश कुमार छित्तरमल मेवाळा वय ४२ रा आलाउमरोट त.साजापर जि मध्यप्रदेश २) उमेश मारोतीराव पानतावने वय ४८ रा कांद्री कन्हान .चे विरुध्द पो.स्टे. कन्हान येथे कलम ३७९, १०९ भा.दं.वि.चा गुन्हा करण्यात आला असून पुढील तपास पोहवा जियालाल सहारे मोन ९३०९९६६३९२ हे करीत आहेत.

## —: चोरी (रेती) :—

**पो.स्टे. कन्हान :—** अंतर्गत ०८ किमी अंतरावरील जुनिकामठी ग्रमपचायत कन्हान जवळ दिनांक १७/०५/२०२१ चे ०१/३० ते ०२/०० वा. चे दरम्यान सधानुश धनपाल मेश्राम वय २४ रा जुनिकामठी हा क पांढ—या रगाची बोलेरो पिकअप एम.एच. ३२ ए.जे. ०१७७ रेती वाहतुक करताना मिळुन आल्याने असलेली त्यास रॉयल्टी बाबद विचारपुस केली असता त्यानी सागितले, तो जुनिकामठी कन्हान नदीचे पात्रातुन बिना रॉयल्टी ची रेती चोरून नेत आहे. **अर्धा ब्रास रेती कि. २००० रू व बोलेरो पिकअप एम एच ३२ ए जे ०१७७ कि. अदाजे ४,००००० असा एकुण ४,०२,०००चा माल** जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादी पोशि सुधीर चव्हान पो.स्टे. कन्हान चे लेखी रिपोर्ट वरुन आरोपी सधानुश धनपाल मेश्राम वय २४ रा जुनिकामठी विरुध्द पो.स्टे. कन्हान येथे कलम ३७९ भादवी चा गुन्हा करण्यात आला असून पुढील तपास पोहवा जोसेफ मोन ८२७५८ ७१५०४ हे करीत आहे.

## —: चोरी (डिझल) :—

**पो.स्टे. कन्हान :—** अंतर्गत ०४ किमी अंतरावरील कामठी ओसीएम परिसरात येथे १७/०५/२०२१ चे २०/३० ते २०/४० वा. दर. जंगलु गंगाराम वडोद्रे वय ५९ रा शिवाजी नगर, सुरक्षा गार्ड वेकोली हे आपले सोबतील सुरक्षा गार्ड सह परिसरात पेट्रोलिंग ड्युटीकरित असतांना त्यांना टाटा कंपनिचे पोकलॅन्ड मशिनचे डिझल टकिचे झाकण उघडुन मशिन मधुन अंदाजे **३० ते ३५ लिटर डिझल एकुण किं.२,८०० रू माल** कोणीतरी इसमाने चोरून नेल्याचे आढळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी जंगलु गंगाराम वडोद्रे वय ५९ रा शिवाजी नगर, सुरक्षा गार्ड वेकोली चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. कन्हान येथे कलम ३७९ भादवी चा गुन्हा करण्यात आला असून पुढील तपास पोहवा अरुण सहारे मोन. ९३०९५ ९२५१२ हे करीत आहे.

## —: चोरी ( जनवार ) :—

**पो.स्टे. काटोल :—** अंतर्गत ६ कि.मी. अंतरावरील मौजा खूटांबा येथील रहवासी भावीक राजेन्द्र काळे वय २६ वर्ष रा खूटांबा हे आपले शेतातच घर बांधून राहतात दिनांक १६/५/२०२१ चे २३/०० ते १७/५/२०२१ चे ०५/०० वा. दर. आपले जनावरे सायंकाळी संत्राच्या झाडाला बांधून शिवारातील घरात आराम करत होते सकाळी उठून जनावराची पाहणी केली असता शेतात संत्राच्या झाडाला बाधलेल्या ५ जनावरापैकी **एक पांढ—या रंगाची गाय किंमती रुपये ५०००/—** ची अज्ञात आरोपीने चोरुन नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी भावीक राजेन्द्र काळे वय २६ वर्ष रा खूटांबा चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. काटोल येथे कलम ३७९ भादवी चा गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास मपोहवा पंचफूला मोरे मो.नं. ९०४९६०७११५ हे करीत आहे.

## —: चोरी ( मोटार सायकल ) :—

**पो.स्टे. नरखेड :—** नरखेड शहर निवासी किशोर विष्णू ताले वय ३८ वर्ष रा. वार्ड नं. ९ नरखेड यांनी आपली पॅशन प्रो हिरो काळया रंगाची**एम.एच.४० ए.बी. ०६८० या क्रमांकाची** मोटार सायकल दिनांक १५/०५/२०१ रोजी रात्री आपल्या घरासमोर उभी केली होती ती रात्री दरम्यान कोणतरी अज्ञात चोरानी चोरुन नेलीं.

सदर प्रकरणी फिर्यादी किशोर विष्णू ताले वय ३८ वर्ष रा. वार्ड नं. ९ नरखेड चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. नरखेड येथे कलम ३७९ भादवी चा गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सफौ ५४२ राजु गजभीये मो.नं. ८००७१ ६१९६५ हे करीत आहे.

**पो.स्टे. सावनेर :—** सावनेर शहर येथे श्री बापूरावजी घटें रा. घटे हॉस्पीटल जवळ, छिंदवाडा रोड सावनेर, ता. सावनेर यांच्या घरी किरायाने राहणारे णेश होलाराम उईके वय ३० वर्ष यांनी आपल्या किरायाचे घरा समोर उभी केलेली ग्रे रंगाची निळया पटयाची होन्डा कंपनिची शाईन **मोटर सायकल नं.एम.एच.४०ए.झेड.३०८६** दिनांक १५/०५/२०१ चे रात्री दरम्यान कोणतरी अज्ञात चोरानी चोरुन नेलें.

सदर प्रकरणी फिर्यादी गणेश होलाराम उईके वय ३० वर्ष रा. व्दारा श्री बापूरावजी घटें रा. घटे हॉस्पीटल जवळ, छिंदवाडा रोड सावनेर, ता. सावनेर यांच्या घरी किरायाने चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. सावनेर येथे कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सफौ/१६२९ राजेन्द्र यादव मो. क्र.९४२३६ ०२९८७ हे करीत आहे.

## —: फसवणुक ( ऑन—लाईन ) :—

**पो.स्टे. मौदा :—** अंतर्गत साईनगर मौदा येथील निवासी अक्षयकुमार रामभाउ येळने रा साई नगर मौदा यांना दिनांक १७.०५.२०२१ चे १०.१५ वा. चे दरम्यान त्यांचे मोबाईल क्रमांक ९५०३३८३६८० वर मोबाईल क्रमांक ८३४३०३३८५६३ वरुन मॅसेज आला असता त्यानी त्यावर फोन केला असता यांना सांगीतले की, मी एयटेल ऑफीस मधुन बोलत आहे, जी एयरटेलची सिम होती त्याचे आधार आयडी पेडींग आहे, जो पर्यत तुम्ही आधार आयडी सादर करणार नाही तो पर्यत तुमचे नेटवर्क कमी जास्त होत राहील व तूमचा चोवीस तासामध्ये जियो चा मोबाईल क्रमांक ९५०३३८३६८० हा बंद होईल. नंतर त्यांनी प्ले स्टोर मधून **कयू एस अप्लीकेशन** डाउलोड करण्यास सांगितले कटिन्यूची बटन प्रेस करा नंतर अलाऊ ची बटन प्रेस करा व नंतर स्टार्ट फॉम ची बटल प्रेस करा असे सांगतील्यावर अक्षयकुमार रामभाउ येळने यांनी बटन प्रेस केल्यावर मोबाईल वर युजर आयडी क्रमांक १४४२०७१४८ आली असता फोन करणाऱ्यांनी अक्षयकुमार रामभाउ येळने यांना युजर आयडी सांगायला लावली, अक्षयकुमार रामभाउ येळने यांनी आयडी सांगितली नंतर त्यानी यांना माय जियो ॲप वर जावून टॉप—अप मारायला सांगितले. अक्षयकुमार रामभाउ येळने यांचे अंकाउट मध्ये पैसे नसल्याने त्यांनी माझे वडिल यांचे सेट्रल बॅक आफ इंडिया चे एटीएम कॉर्ड मधून १० रु चा टॉप—अप मारला १० रु डेबिट झाले बाबतचा मॅसेज वडिल यांचे मो.क्र.९३२५९३२१०७ मॅसेज आला नंतर अक्षयकुमार रामभाउ येळने चे मोबाईल क्रमांकवर ९०० रु डेबीट झाल्याचा मॅसेज आला त्यानंर त्यांचे **वडिल अंकाउट मधून ४९,०००/रु डेबीट झालाचा मॅसेज आला.** मोबाईल क्रमांक ८३४३०३३८५६३ द्वारे अक्षयकुमार रामभाउ येळने यांची **एकुण रुपये ४९,००० /रु ची ऑनलाईन आर्थिक फसवणूक झाल्याचे त्यांचे लक्षात आले.**

सदर प्रकरणी फिर्यादी अक्षयकुमार रामभाउ येळने रा साई नगर मौदा चे तोंडी रिपोर्ट वरुन आरोपी मो क्र ८३४३०३८५६३ चा धारक विरुध्द पो.स्टे. मौदा येथे कलम ४२० **भा.दं.वि. सहकलम ६६ (ड) मा. तंत्रज्ञान अधि अन्वये** गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक विजय जाधव मो.नं. ९८७०३२८९०४ हे करीत आहे.

## —: गैर कायद्यांची मंडळी जमविणे :—

**पो.स्टे. कुही :—** अंतर्गत ३० किमी अंतरावरील सालई गोधनी येथे दिनांक १६/०५/२०२१ चे १९/०० वा.सुमारास सौ.लक्ष्मी रमेश पारसे वय ५० वर्ष, रा.सालई (गोधनी) याचे मुलाचा पाय गोपाल हरबाजी पोटे वय ५६ वर्ष, रा.सालई गोधनी, ता. जि.नागपुर, चे मोटार सायकल लागल्याने खाली पडली या वादातुन दोन्ही पक्षानी गैरकायद्याची मंडळी जमवुन एकमेकांना शिवीगाळी करून मारण्याची धमकी देवुन वेळुच्या काठीने तसेच लोखंडी सळाखीने मारहाण करून दोन्ही पक्षातील लोक गंभीर जखमी/ फॅक्चर झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी सौ.लक्ष्मी रमेश पारसे वय ५० वर्ष, रा.सालई(गोधनी), ता.जि.नागपुर, तसेच गोपाल हरबाजी पोटे वय ५६ वर्ष, रा.सालई गोधनी, ता. जि.नागपुर चे तोंडी रिपोर्ट व वैद्यकीय अधिकारी यांचे रिपोर्ट वरुन दोन्ही पक्षकार विरुध्द पो.स्टे. कुही येथे अप क्रमांक १३३/२०२१ कलम १४३,१४७,१४८, १४९, ३२३, ३२४,३२५,३२६,५०४,५०६ व अप.क्रमांक .१३४/२०२१ कलम ३२४,३२५, १४३,१४७, १४८,१४९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास मसपोनि सुचिता मंडवाले, पोस्टे. कुही, मो.क्र. ९६६३२३४५४८ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर